मासेमारी ठेक्याची निवीदा

( माहे 01 जुलै, 2025 ते माहे 30 जुन, 2030)

ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या तलावातील मासेमारीचा ठेका हा (05) पाच वर्षाच्या कालावधीसाठी ठेका मंजुर झालेल्या दिनांकापासून मासेमारी हक्का सबंधीच्या ठेक्याची नोंदणीकृत झालेल्या मच्छीमार सहकारी संस्था, ठाणे यांचे अध्यक्षाने अथवा संस्थेच्या अधिकृत संस्थांनी मासेमारी ठेका/निवीदा या दि.16.07.2025 ते दि.22.07.2025 रोजी कार्यलयीन वेळेत सायंकाळी 5 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निवीदा दिनांक 23 जूलै, 2025 रोजी सकाळी 11.30 वा. मा. अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे यांचे दालनात उघडण्यात येतील. उघडण्यात आलेल्या निवीदा हया भरण्यात आलेल्या सबंधीत संस्थेचे अध्यक्ष अथवा प्रतिनिधी यांची बोलणी करुन जी संस्था जास्तीत जास्त बोली करेल, अशा सहकारी संस्थेस (05) पाच वर्षाच्या कालावधीसाठी मासेमारीचा ठेका देण्यात येईल. सदर ठेक्या संबंधीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

1. ठाणे परिसरातील सर्व गोडया पाण्यात मच्छीमार करणाऱ्या व नोंदणी झालेल्या (रजिस्टर्ड) मच्छीमार सहाकारी संस्थांनाच लिलावामध्ये भाग घेता येईल व त्या संस्थानाच ग्राहय धरण्यात येईल. मा. महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं मत्सवि 2016/प्र.क्र/171/पदुम 13, मुंबई – 32 दिनांक 03 जूलै, 2019 मधील अटी व नियमांचे व पोटनियमांचे प्रमाणित प्रती सादर कराव्या लागतील व त्यांची संस्था नोंदणी झालेली आहे व ती संस्था सदया अस्तिवात आहे अशा आशयाचे साक्षांकित केलेले प्रमाणपत्र उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांचे सही व शिक्यानिशी लिलावाचे दिवशी सादर करावे लागतील.

2. निवीदा सादर करतांना दोन लिफाफयामध्ये सादर करण्यात यावी. एक लिफाफयामध्ये तांत्रिक माहीती उप निबंधक, सहकारी संस्था यांचेकडील अ) नोंदणी प्रमाणपत्र, ब) गत तीन वर्षाचे लेखा परिक्षण व ताळेबंद प्रमाणपत्र, क) जलाशयाची ठेका रक्कम व अनामत रक्कम बँक खात्यावर जमा असणे बंधनकारक आहे., ड) अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र, इ) आयकर भरण्याबाबत विवरणपत्र यांच्या छायांकिन प्रती व दुसऱ्या लिफाफयामध्ये लिलावाची किंमत दर्शविलेला फॉर्म असे दोन वेगवेगळे लिफाफे असावेत.

3. काही संस्थांना त्यांचे पोट नियमानुसार फक्त खाऱ्या पाण्यातील मासेमारी करण्याचा हक्क असेल तर अशा संस्थांना लिलावात भाग घेता येणार नाही.

4. विहीत नमुन्यातील निवीदा अर्ज व त्यासोबत शर्ती व अटी अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह यांचे कार्यालयात रु. 500/- भरुन कार्यालयीन वेळेत दि. 18/7/2025 पासुन दि. 21/7/2025 पर्यंत सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत मिळू शकतील.

5. तसेच भाग घेण्यापुर्वी प्रत्येक संस्थेस अनामत रक्कम म्हणुन रु. 50,000/- (अक्षरी रु. पन्नास हजार मात्र) कारागृह कार्यालयात रोख भरावी लागेल, अनामत रक्कम ही लिलावाच्या पुर्वी दिनांक 21/07/2025 रोजी सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत स्विकारली जाईल. अनामत रक्कम रु. 50,000/- (अक्षरी रु. पन्नास हजार मात्र) ही रोखीने जमा करणे प्रत्येक निवीदाधारकास बंधनकारक आहे. त्यानंतर अनामत रक्कम स्वीकारली जाणार नाही. अनामत रक्कम भरल्या शिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. लिलावात अयशस्वी झालेल्या संस्थांना अनामत रक्कम लिलाव पुर्ण झाल्यावर परत केली जाईल.

6. लिलाव ज्या ठिकाणी चालणार आहे त्या कार्यालयास ज्या संस्थेची अनामत रक्कम भरली आहे अशा संस्थेच्या अध्यक्षास अथवा संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी (की ज्यांचे नाव लेखी लिलावापुर्वी सादर करावे लागेल) लिलावात प्रवेश मिळु शकेल आणि लिलावात बोल बोलण्याचा अधिकार त्याचाच राहिल. लिलावात इतरांना भाग घेता येणार नाही, अथवा प्रवेश देता येणार नाही.

7. निवीदा मंजुर झाल्यापासुन पाच वर्षाच्या कालावधीसाठी हा लिलाव पुकारण्यात येत असुन या (05) पाच वर्षासाठी एकुण खरेदी बोली लिलावात बोलावी लागेल. तसेच लिलावाची बोली संपुर्ण दहा आणि दहाच्या पटीने बोलावी लागेल. लिलावात ज्यांची बोली जास्त होईल त्या संस्थेस एकुण रक्कमेपैकी वर्ष निहाय रक्कम प्रत्येक वर्षी आगाऊ भरणा करावी लागेल. सदरची रक्कम भरण्यास विलंब झाल्यास अनामत रक्कम जप्त करुन सदरचा ठेका तात्काळ रदद करण्यात येवुन संबंधीतांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

8. निवीदा मंजुर झालेल्या संस्थेने तलावाची सर्व स्वच्छता करावी. तलावात कोणत्याही प्रकारची घाण राहणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

9. तलावासाठी लागणाऱ्या विदयुत पुरवठयाचे (एरिएशन मशिनचे) देयक संबंधीत ठेकेदारास अदा करावे लागेल.

10. लिलाव पुर्ण झाल्यावर आणि लिलाव यशस्वी झालेल्या संस्थेचे लिलावाचे एक वर्षाची आगाऊ रक्कम कारागृह कार्यालयात भरल्यानंतर लिलावाचे प्रकरण मा. मुख्यालयाची/उपमुख्यालयाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ठेका सुरु होईल.

11. लिलावास मंजुरी मिळाल्यानंतर लिलाव घेणाऱ्या संस्थेस योग्य त्या किंमतीचे स्टॅम्प डयुटी भरावी लागेल. करारनाम्याची प्रत कारागृह कार्यालयात पाहणेसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल व त्याप्रमाणे करारनामा करुन घ्यावा लागेल.

12.कोणत्याही शासकीय/इतर कोणत्याही कारणास्तव जर लिलाव रदद करण्यात आला तर लिलाव घेणाऱ्या संस्थेस संस्थेने भरलेली अनामत मूळ रक्कम परत करण्यात येईल. परंतु या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही.

13.वरील अटी लिलावापुर्वी सर्व संस्था प्रमुखांना/प्रतिनिधींना वाचुन दाखविण्यात येतील. प्रतिनिधींच्या त्यावर सहया घेउन मगच लिलावाची सुरवात करण्यात येईल आणि या सर्व अटी संस्थांना बंधनकारक राहतील.

14.लिलावाची संपूर्ण प्रकीया किंवा लिलाव निवीदा नाकारण्याचा अधिकार हा कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

स्वाक्षरीत
अधीक्षक
ठाणे मध्यवर्ती कारागृह